**20 डिसेंबर २०१६**

# राष्ट्रीय पक्षांना मिळालेल्या देणग्यांचे विश्लेषण - आर्थिक वर्ष २०१५-१६

## नेशनल इलेक्शन वॉच

## आणि

## असोसिअशन फॉर डेमोक्रेटीक रीफोर्म्स

## कडून एक अहवाल

असोसिएशन फॉर डेमोक्रेटिक रीफोर्म्स

टी-९५ अ, पहिला मजला,

सी.एल.हाउस, गौतम नगर,

नवी दिल्ली -११० ०४९

इमेल : adr@adrindia.org

फोन:+९१-०११-४१६५ -४२००

# रु. 20,000 पेक्षा जास्त प्राप्त राष्ट्रीय राजकीय पक्षांच्या देणगीचे विश्लेषण - आर्थिक वर्ष 2015-16

२०१५-२०१६ आर्थीक वर्षात राष्ट्रीय राजकीय पक्षांना मिळालेल्या 20,000 रुपयांपेक्षा जास्त देणगी लक्षात ठेवून हा अहवाल **असोसिअशन फॉर डेमोक्रेटीक रीफोर्म्स (ADR)** आणि **नेशनल इलेक्शन वॉच (NEW)** कडून तयार करण्यात आला आहे, जो पक्षांनी भारतीय निवडणूक आयोगाला (ECI) सादर केला आहे. राष्ट्रीय पक्षात या पक्षांचा समावेश आहे - भारतीय जनता पार्टी (भाजप), भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस (कॉंग्रेस), बहुजन समाज पक्ष (बसपा), राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी (राष्ट्रवादी), भारतीय कम्युनिस्ट पक्ष (भाकप), भारतीय कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) आणि अखिल भारतीय तृणमूल कॉंग्रेस (AITC). अखिल भारतीय तृणमूल कॉंग्रेसला भारतीय निवडणूक आयोगाद्वारे पश्चिम बंगाल, मणिपूर, त्रिपुरा आणि अरुणाचल प्रदेशाचे राज्य पक्ष म्हणुन मान्यता मिळाली आहे, म्हणून राष्ट्रीय पक्ष घोषित करण्यात आले होते, याची नोंद असावी.

## सारांश

### अहवालातील महत्वाच्या निरीक्षणांचा सारांश:

I. <u>संपूर्ण भारतातून रु. २०,००० पेक्षा जास्त देणगी मिळालेले राष्ट्रीय पक्ष **(FY २०१५-१६) -**</u>

a) आर्थिक वर्ष 2015-16 दरम्यान राष्ट्रीय राजकीय पक्षांना प्राप्त 20,000रु.पेक्षा जास्त रकमेच्या देणग्या दरवर्षी निवडणूक आयोगाला सादर होणाऱ्या देणग्या अहवालातून काढलेले आहे

b) राष्ट्रीय पक्षांची रु.२०,००० व त्यापेक्षा जास्त एकूण जाहीर देणगी रक्कम रू.१०२.०२ कोटी हि १७४४ देणगीतून आली आहे.

c) एकूण रु.७६.८५ कोटी ६१३ देणगीतून भाजप द्वारे जाहीर करण्यात आले. तर INC द्वारे रु २०.४२ कोटी ९१८ देणगीतून मिळाल्याचे जाहीर करण्यात आले.याच कालावधीत भाजप द्वारे जाहीर केलेली देणगी INC,NCP,CPI,CPM आणि AITC द्वारे जाहीर केलेल्या देणगी पेक्षा तीन पट जास्त आहे.

d) BSP ने जाहीर केले कि पक्षाला आर्थिक वर्ष २०१५-१६ दरम्यान रु. २०,००० पेक्षा जास्त एकपण देणगी मिळालेली नाही, व हेच ते गेल्या दहा वर्षा पासून जाहीर करत आहे.




II. <u>आर्थिक वर्ष 2014-15 आणि आर्थिक वर्ष 2015-16 दरम्यान राष्ट्रीय पक्षांची प्राप्त देणग्यांची तुलना -</u>

a. आर्थिक वर्ष २०१५-१६ दरम्यान राष्ट्रीय पक्षांच्या देणग्या रु. ५२८.६७ कोटी ने घटली, गत आर्थिकवर्ष २०१४-१५ च्या मानाने ८४% घटली .

b. **NCP** ने आर्थिक वर्ष २०१४-१५ मध्ये रु.३८.८२ कोटी तर आर्थिक वर्ष २०१५-१६ मध्ये ७१ लाख अशी ९८% सर्वाधिक घट जाहीर केली, तर भाजप च्या देणग्या आर्थिक वर्ष २०१४-१५ दरम्यान रु. ४३७.३५ कोटी ते रु. ७६.८५ कोटी आर्थिक वर्ष २०१५-१६ दरम्यान घटली [८२% घट].

c. भाजप च्या देणग्या आर्थिक वर्ष २०१३-१४ आणि २०१४-१५ या दरम्यान १५६% वाढल्या तर याच कालावधीत INC च्या पण १३७% वाढल्या, याची नोंद आहे.



III. राष्ट्रीय पक्षांद्वारे घोषित जाहीर रोख देणग्या - आर्थिक वर्ष २०१५-१६ -

**२९ ऑगस्ट २०१४ ला भारतीय निवडणूक आयोगाने सूचना द्वारे प्रतिपादित केले** कि **"कोणत्याही व्यक्ती किंवा कंपनी द्वारे राजकीय पक्षाला रोख योगदान केल्या बद्दल आयकर कपातीची परवानगी दिली जाणार नाही".** ही सूचना आर्थिक वर्ष २०१४-१५ पुढे केलेल्या देणग्यांवर लागू होते. अशा प्रकारे, राजकीय पक्षांना येणाऱ्या रोख देणग्यां मध्ये लक्षणीय घट झाली. आर्थिक वर्ष २०१४-१५ दरम्यान राष्ट्रीय पक्षांनी फक्त रु. ८९ लाख रोख मिळवत असल्याचे जाहीर केले जे पक्षाच्या रु.२०,००० पेक्षा जास्त एकूण देणग्यांचे ०.१४% होतात.

a. आर्थिक वर्ष २०१५-१६ दरम्यान राष्ट्रीय पक्षांद्वारे जे एकूण देणग्या पैकी १०२.०२ कोटी जाहीर करण्यात आले, त्यापैकी रु.१.४५ कोटी ११२ देण्ग्यातून रोख मिळवले, जे पक्षाच्या एकूण देणगीचे १.४२% होतात.
b. १० राज्य/केंद्र शासित प्रदेशातून INC ने जास्तीत जास्त रोख देणगी एकूण १.१७ कोटी मिळवल्याचे जाहीर केले त्याच सोबत CPI ने १२ राज्य /केंद्र शासित प्रदेशातून रु.२२.२२ लाख आणि भाजप ने फक्त बिहार मधून रु. ५१,००० रोख देणगी जाहीर केली**.**
c. या सर्व राज्यांमध्ये, कर्नाटकाच्या देणगी दात्यांनी सर्वात जास्त रु. ८० लाख रोख देणगी दिली त्याच सोबत मेघालयाच्या देणगी दात्यांनी एकूण रु. २१.५४ लाख रोख देणगी दिली. दोन्ही सर्वाधिक देणग्या INC ला देण्यात आल्या.




IV. राष्ट्रीय पक्षांना राज्यानुसार देणग्या - रोख, चेक, DD, बँक द्वारे -

a. ADR / NEW चा राज्यानुसार तयार करण्यात आलेल्या देणग्यांचा अहवाल हा राजकीय पक्षा द्वारे ECI ला पुरवलेल्या त्यांच्या देणगीच्या पत्त्यांच्या माहितीच्या अहवालावर आधारित आहे .
b. राष्ट्रीय पक्षांना एकूण रु. ५४.१३ कोटी दिल्लीतून तसेच रु. ११.९२ कोटी महाराष्ट्रातून आणि रु. ८.६४ कोटी कर्नाटकातून दान करण्यात आले.

c. राजकीय पक्षांनी अपूर्ण माहिती पुरवली असल्यामुळे एकूण रु. २. ६१ कोटी ही रक्कम (जे आर्थिक वर्ष २०१५-१६ मध्ये देणगीचे जे ३% राष्ट्रीय पक्षांनी मिळवले) कुठल्या राज्यातील किंवा केंद्रशासित प्रदेशाशी संबंधित आहे, ते सांगता येत नाही.

V. कॉर्पोरेट / व्यवसाय क्षेत्रातील देणगीदार विरुध वैयक्तिक देणगीदार -

a. आर्थिक वर्ष २०१५-१६ दरम्यान कॉर्पोरेट / व्यवसाय क्षेत्रातुन रु. ७७.२८ कोटी रक्कम ३५९ देण्ग्यातून (७५.७५% एकूण देणगीतून) राष्ट्रीय पक्षांना दिली गेली  तसेच पक्षाला १३२२ वैयक्तिक देणगीदारांकडून रु.२३.४१ कोटी (२२.९५% एकूण देणगीतून ) दान करण्यात आले.

b. आर्थिक वर्ष २०१५-१६ मध्ये कॉर्पोरेट / व्यवसाय क्षेत्रातुन २८३ देणगीदारांकडून रु. ६७.९९ कोटी रक्कम भाजपला दान करण्यात आली तसेच ३३० वैयक्तिक देणगीदारांकडून रु. ८.८६ कोटी भाजपला दान करण्यात आले.

c. आर्थिक वर्ष २०१५-१६ दरम्यान कॉर्पोरेट/व्यवसाय क्षेत्रातुन INC ला ५७ देणगीदारांकडून रु. ८.८३ कोटी प्राप्त झाले आणि ८५९ वैयक्तिक देणगीदारांकडून रु ११.२४ कोटी प्राप्त झाले .




VI. देणगीच्या अपूर्ण माहितीच्या प्रगटीकरणाचा अहवाल-

a. ७ राष्ट्रीय पक्षांपैकी ४ पक्ष BJP,INC,CPI आणि NCP ने ४७३ देणगीदार ज्यांच्या कडून रु. ११.६८ कोटी प्राप्त केले, त्यांचा PAN तपशील जाहीर केला नाही. INC ने ३१८ देणगीदारांकडून रु ८.११ कोटी जमा केले पण देणगीदारांचा PAN तपशील देण्यात असमर्थ राहिले तसेच BJP ने ७१ देणगीदारांकडून रु. २.१९ कोटी जमा केले, PAN तपशिला शिवाय.

b. ECI द्वारे देणगी सादर करण्याच्या निर्दिष्ट स्वरूपाशी CPM एकनिष्ठ नाही. पक्षाने त्यांच्या ६१ देणगीदारांपैकी कोणाच्याही योगदानाच्या प्रारूपाचे तपशील प्रदान केलेले नाही. अशा प्रकारच्या तपशीलात

चेक, DD क्रमांक, बँक जिथून रक्कम काढण्यात आली, पावतीची तारीख किंवा रोख देणगी असो किंवा बँकेतून हस्तांतरित केल्याचा समावेश आहे.

c. तसेच AITC ने एकूण ६५ लाख योगदान केलेले त्यांच्या १२ देणगीदारांपैकी कोणाचेही चेक क्रमांक,बँक जिथून रक्कम काढण्यात आली आणि चेक मिळवल्याची तारीख/रोख रकमेत बदलल्याचे पुरावे प्रदान केलेले नाही. म्हणूनच, पूर्ण चेक / DD तपशिला शिवाय देणगीदारांना त्यांच्या देणगी शी जोडण्याची ही एक वेळ खाऊ प्रक्रिया असणार आणि म्हणूनच त्या पैश्याचा आराखडा काढावा.

d. CPI ने सुद्धा त्यांच्या ७१ देणगीतून पक्षाने मिळवलेले एकूण रु. १.१९ कोटी चे चेक/DD/बँक हस्तांतरणाचा तपशील घोषित केलेला नाही.

e. CPI ने त्यांच्या पक्षाचे १३ राज्य सचिवांचे नाव, PAN नंबर घोषित केलेले नाही तरी देखील त्यांच्या योगदानाची रक्कम रु. ५९.६८ लाख आहे. एकंदरीतच,पक्षाने आर्थिक वर्ष २०१५-१६ दरम्यान प्राप्त केलेली एकूण रक्कम रु. १.१३ कोटी च्या ८२ देणगीदारांच्या PAN तपशिलाची माहिती पुरवलेली नाही..

VII. <u>आर्थिक वर्ष २०१५-१६ चे राष्ट्रीय पक्षाचे सर्वाधिक देणगीदार -</u>




a. सत्या इलेक्टोरल ट्रस्ट द्वारे BJP आणि INC ला एकूण रु.४७ कोटी दान करण्यात आले आणि हे या दोन्ही पक्षांचे दोन सर्वाधिक देणगीदार आहेत. ट्रस्ट ने BJP ला रु.४५ कोटी (पक्षाला प्राप्त एकूण निधी चे ५८.५६%) आणि INC ला रु.२ कोटी (पक्षाला प्राप्त एकूण निधी चे ९.७९%) दान केले.

b. CPI चे देणगी जमा करण्याचे साधन आहेत निधी संकलन, कर आणि सदस्यत्व शुल्क. अधिकतम देणगी रक्कम सचिव केरळ राज्य परिषद (रु.३६.८ लाख) तसेच सुधाकर रेड्डी (रु.११ लाख) तर्फे होती.

# ADR चे निरीक्षण आणि शिफारस

## निरीक्षण

a. आर्थिक वर्ष २०१५-१६ साठी राष्ट्रीय पक्षा द्वारे घोषित केलेल्या देणगी तपशिला ची असमंजसपणा अजूनही तशी आहे.

b. आर्थिक वर्ष २०१४-१५ दरम्यान INC चे सादर केलेल्या अहवाला द्वारे १९२ देणगीदारांची रु.१३८.९८ कोटी देणगी चे चेक/DD नंबर सादरीकरण साधनाच्या स्तंभात समाविष्ट नाही. हे रु. २०,००० पेक्षा जास्त, एकूण रकमेचे ९८% होते.

c. आर्थिक वर्ष २०१५-१६ दरम्यान INC द्वारे घोषित असे ३१८ देणगीदारांपासून रु.८.११ कोटी मिळवल्याचे जाहीर करण्यात आले ज्यांचा PAN तपशील अनुपलब्ध आहे. ४९% निधी वैयक्तिक रीते प्राप्त झाली ज्याने रु.३.९९ कोटी देणगी मिळाली आणि ५१% कॉर्पोरेट देणगीदारांकडून प्राप्त झाले ज्याने रु.४.१२ कोटी देणगी मिळाली. राजकीय पक्षा द्वारे कायद्याची उपेक्षा आणि दिखाऊपणा ला अंकुश लावले पाहिजे व अपूर्ण तपशील असलेल्या दोषी पक्षाच्या देणगीला १००% कर सूट चा लाभ मिळू नये.

d. आर्थिक वर्ष २०१४-१५ दरम्यान BJP ने रु.८३.९१५ लाख अशा २० देणगीदारांकडून मिळाल्याचे जाहीर केले ज्यांचे PAN तपशील,पत्ता आणि योगदानाचे साधन (एकत्र) अनुपलब्ध होते. त्यामुळे, अशा दात्यांचे फक्त नाव आणि योगादाना ची रक्कम  पक्षाद्वारे घोषित करण्यात आली. अशी ७३% निधी कॉर्पोरेट आणि २७% वैयक्तिक देणगीदारांकडून आली आहे.

e. BJP ने आर्थिक वर्ष २०१५-१६ साठी ७१ देणगीदारांकडून रु.२.१९ कोटी PAN तपशील सादर केल्याशिवाय अहवाल जमा केले.

f. आर्थिक वर्ष २०१५-१६ साठी सादर केलेल्या CPM च्या अहवालात, ६१ देणगीदारांच्या रु. १.८१ कोटी रक्कम चा योगदान सादरी कारणाचा स्तंभ गहाळ आहे.अशा प्रकारे पक्षाची एकूण २०,००० पेक्षा जास्त देणगी १००% होते. म्हणूनच, पूर्ण चेक/DD तपशिला शिवाय देणगीदारांना त्यांच्या देणगी शी जोडण्याची ही एक वेळ खाऊ प्रक्रिया असणार आणि म्हणूनच त्या पैश्याचा आराखडा काढावा.

## शिफारस

a. सर्वोच्च न्यायालयाने १३ सप्टेंबर२०१३ ला एक निकाल जाहीर केला ज्यात उमेदवाराच्या प्रतिज्ञा पत्रात कोणताही भाग रिक्त असता कामा नये.तसेच राजकीय पक्षा तर्फे प्रदान करण्यात आलेल्या २०,००० पेक्षा जास्त देणगीचा अर्ज 24A चा कोणताही भाग रिक्त नसावा.

b. देण्गीदाराचा संपूर्ण तपशील माहिती अधिकार कायद्याच्या अंतर्गत सार्वजनिक छाननी साठी उपलब्ध केला पाहिजे. असे काही देशांमधून केले जाते जसे कि भूतान, नेपाळ, जर्मनी, फ्रांस, इटली, ब्राझील, बल्गेरिया, अमेरिका आणि जपान, या देशांपैकी कुठेही ७५% निधीचा स्त्रोत अज्ञात असणे शक्य नाही, पण वर्तमानात भारतात अजूनही आहे.

c. राष्ट्रीय आणि प्रादेशिक पक्षांनी पुढाकार घेऊन देणगीची संपूर्ण व योग्य माहिती सार्वजनिक छाननी साठी योग्य वेळेत ECI ला सादर करून आदर्श उदाहरण ठेवावे जेणे करून आर्थिक पारदर्शिततेला प्रोत्साहन मिळेल.
d. माहिती अधिकाराच्या कायद्या खाली सर्व राष्ट्रीय आणि प्रादेशिक पक्षांनी त्यांची संपूर्ण आर्थीक माहिती प्रदान करणे आवश्यक आहे. हे राजकीय पक्ष, मतदान आणि लोकशाहीला मजबूत करण्यात महत्वाचे ठरेल, अधिक माहिती साठी ह्याचा संदर्भ घ्या https://goo.gl/o1qFYT.

## Contacts


Media and Journalist Helpline

+91 80103 94248
Email: adr@adrindia.org

Maj Gen Anil Verma (Retd.)
Head
NEW & ADR

+91 8826479910
anilverma@adrindia.org

Prof Jagdeep Chhokar
IIM Ahmedabad (Retd)
Founder NEW & ADR

+919999620944
jchhokar@gmail.com

Prof Trilochan Sastry
IIM Bangalore
Founder Member,
NEW & ADR
+919448353285,
trilochans@iimb.ernet.in


## Disclaimer

या अहवालाच्या माहितीचे विश्लेषण राजकीय पक्षांनी भारतीय निवडणूक आयोगाला सादर केलेल्या आर्थिक वर्ष २०१५-१६ च्या अहवालावर आधारित आहे. समान माहिती येथेही उपलब्ध आहे - http://eci.nic.in/eci_main1/PolPar/political_parties_Contribution_report_2015.aspx

राष्ट्रीय पक्षांना देणगी देणारे संपूर्ण देणगीदारांच्या यादी साठी कृपया येथे भेट द्या **http://myneta.info/party.**

राजकीय पक्षांच्या निधी व इतर संशोधन अहवालासाठी कृपया येथे भेट द्या**http://adrindia.org/research-and-report/political-party-watch**